गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून परिमंडळबाह्य बदल्या केल्यानंतर त्यांची नवीन परिमंडळातील ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः बदली १७१७/ प्र. क्र. ४८५/ आस्था (अतांत्रिक)

दुसरा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक: ५ मे, २०१८.

संदर्भ:-

१) **महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२.**

२) **महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.**

३) **महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम, २००७.**

४) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- एसआरव्ही-२०१०/ प्र. क्र. २१०/ १०/ १२, दिनांक ३ जून, २०११.**

प्रस्तावना:-

संदर्भाधीन क्रमांक २ येथील महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या प्रकरण दोन, कलम ३ (२) अन्वये “गट ड मधील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणाच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्बाध पद रिक्त असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्या विरुद्ध गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज, त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली केली जाणार नाही” अशी तरतुद करण्यात आली आहे.

त्यानुसार जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या आस्थापनेवरील गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार बदलीचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत असतात. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने

शासन मान्यतेने गट ड मधील कर्मचाऱ्यांची बदली एका परिमंडळामधून अन्य परिमंडळांतर्गत देखील करण्यात येते.

संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३ जून, २०११ अन्वये शासन सेवेतील गट ब (अराजपत्रित) व गट क मधील कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरुन/ संवर्गबाह्य बदल्या करण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये अनुक्रमांक ८ येथे संबंधित कर्मचाऱ्याची बदलीनंतर त्या पदावरील ज्येष्ठता रुजू झाल्याच्या दिनांकास निश्चित होईल. तसेच, पूर्वीच्या सेवेचा लाभ वेतन निश्चिती, रजा, निवृत्तीवेतन याकरीता वित्त विभागाच्या संबंधित नियमांतील तरतुदींनुसार अनुज्ञेय होईल, याप्रमाणे अट विहित करण्यात आली आहे.

तथापि, गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार/ संवर्गबाह्य/ करण्यात आलेल्या बदल्यांनंतर त्यांची नवीन परिमंडळातील ज्येष्ठता कशा पद्धतीने निश्चित करण्यात यावी याबाबत कोणतेही स्पष्ट आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रत्येक परिमंडळामध्ये वेगवेगळे निकष लागू करुन वेगवेगळी सेवा ज्येष्ठता निश्चित करण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेता, समान प्रकरणी समान न्याय होण्याच्या दृष्टीने निर्णय घेणे शक्य व्हावे, याकरीता स्वयंस्पष्ट सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

संदर्भाधीन क्रमांक १ येथील महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ च्या नियम क्रमांक ४ अन्वये ज्येष्ठतेची सर्वसाधारण तत्वे विहित करण्यात आली आहेत.

त्यातील पोटनियम २ (क) मध्ये "बदली झालेल्या शासकीय कर्मचारी ज्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत तो बदली झालेला आहे त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेने त्याची ज्येष्ठता, तो जेथे बदली झाला त्या पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा वर्ग आणि वेतनमान, तेथील त्याचा सेवाकाल आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी निर्धारीत करील" अशी तरतुद करण्यात आली आहे.

सदर नियमावलीच्या नियम ३ (अ) नुसार सक्षम प्राधिकारी याची व्याख्या "कोणत्याही पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी" अशी करण्यात आली आहे. म्हणजेच सदर कार्यवाही करण्याकरीता सक्षम प्राधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी म्हणजेच संबंधित मंडळाचे अधीक्षक अभियंता आहेत.

उपरोक्त तरतुदींनुसार विनंतीवरुन/ अपवादात्मक परिस्थितीत/ विशेष बाब म्हणून गट ड मधील कर्मचाऱ्यांची परिमंडळाबाहेर बदली करण्यात आल्यास त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित करण्याकरीता खालील पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

१) गट ड मधील कर्मचाऱ्यांची विनंतीनुसार/ अपवादात्मक परिस्थितीत/ विशेष बाब म्हणून एका परिमंडळामधून अन्य परिमंडळांतर्गत बदली करण्यात आल्यास बदली झालेल्या

नवीन परिमंडळात सदर कर्मचारी बदलीच्या ठिकाणी ज्या दिनांकास रुजू होईल त्या दिनांकापासून त्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात यावी.

२) अशा कर्मचाऱ्यांना वेतन निश्चिती, रजा, निवृत्तीवेतन याकरीता पूर्वीच्या सेवेचा लाभ वित्त विभागाच्या संबंधित नियमांतील तरतुदींनुसार अनुज्ञेय होईल.

३) बदली आदेश निर्गमित करण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यास तशी स्पष्ट कल्पना लेखी स्वरुपात देण्यात यावी.

४) त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या आदेशांमध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

उपरोक्त सूचनांनुसार कार्यवाही करण्याची दक्षता नियुक्ती प्राधिकारी या नात्याने संबंधित मंडळांचे अधीक्षक अभियंता यांनी घ्यावी. तसेच, सदर सूचना आपल्या अधिनस्त असणाऱ्या सर्व आस्थापना अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांनादेखील त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

प्रस्तुत परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२/ २०१८/ कार्यासन १२, दिनांक १५ जानेवारी, २०१८ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६७/ २०१८/ कार्यासन १२, दिनांक ४ एप्रिल, २०१८ अन्वये दिलेल्या अभिप्रायांस अनुलक्षून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५०५१२३१०१०६२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Shantaram Parab

Digitally signed by Kiran Shantaram Parab
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=235425ab45ace1df268fe006b80c5cf93af9396efa01db7b8f3ae405e79ae523, cn=Kiran Shantaram Parab
Date: 2018.05.05 15:09:05 +05'30'

(कि. शां. परब)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,

२. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,

३. सर्व अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, जलसंपदा विभाग,

४. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,

प्रत माहितीस्तव अग्रेषित,

१. मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

२. मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. प्रधान सचिव (जलसंपदा), यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. सचिव (प्रकल्प व्यवस्थापन), यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सचिव (लाक्षेवि), यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. उपसचिव (आस्था) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अवर सचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. कक्ष अधिकारी आस्था (तांत्रिक), जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई,
९. कक्ष अधिकारी, कार्यासन १२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. कार्यासन आस्था (अतांत्रिक), जलसंपदा विभाग, निवडनस्ती,
११. आस्था (अतांत्रिक) संग्रहार्थ.